| | |
|---|---|
| MHJN020003652018 | वि.दि.दावा क्र.२५/२०१८<br>लक्ष्मीबाई मार्फत वारस–वि–शासन व ई |

**<u>नि.क्र.१०२ वरील आदेश</u>**

. वादी यांनी मुळ दाव्यामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता,आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे कथनानुसार,वादी यांची आजी लक्ष्मीबाई उर्फ सरुबाई भ्र.बाबुराव वाकडे यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला होता,परंतु दावा प्रलंबीत असताना त्यांनी वाद मिळकत वादीच्या नावे वाटणी–पत्रकाद्वारे दिली. त्या अनुषंगाने नगर पंचायत कार्यालय व ७/१२ उता–यामध्ये नोंदी घेण्यात आल्या. वादी यांनी मुळ वादी लक्ष्मीबाई उर्फ सरुबाई भ्र.बाबुराव वाकडे यांच्या मृत्यू झाल्यामुळे त्यांचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणुन आदेश २२ नियम २ व ३,दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये अर्ज दिला होता,तो न्यायालयाने मंजूर केलेला आहे. त्यानुसार मुळ दाव्यामध्ये लक्ष्मीबाई उर्फ सरुबाई भ्र.बाबुराव वाकडे यांचे नाव वगळण्यात येऊन शिवनारायण पि.दिपक वाकडे यांचे नाव समाविष्ट करण्यात आले.

३. वादी यांचे कथनानुसार,मयत लक्ष्मीबाई यांच्या नंतर वाद

मिळकतीचे सर्व अधिकार वादी शिवनारायण यांना आले. त्यानुसार मुळ दाव्यातील परिच्छेद क्र.२ नंतर २–अ म्हणुन नि.क्र.१०२ मधील परिच्छेद क्र.१ नंतर २–अ मध्ये नमूद मजकूर समाविष्ट करावयाचा आहे. तसेच मुळ दाव्यातील परिच्छेद क्र.१२ मधील ओळ क्र.१,परिच्छेद क्र.१३ मधील ओळ क्र.१ आणि परिच्छेद क्र.१६ मधील ओळ क्र.१ मध्ये "वादी यांचा जो उल्लेख आलेला आहे, त्याऐवजी वादी यांची आजी लक्ष्मीबाई" असा बदल करणे आवश्यक आहे. तसेच मुळ दाव्यातील परिच्छेद क्र.१४ मध्ये "वादी यांचा मुलगा असा जो उल्लेख करण्यात आला,त्याऐवजी वादी यांची आजी लक्ष्मीबाई बाबुराव वाकडे" असा बदल करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती केल्यास मुळ दाव्याचे कुठलेही स्वरुप बदलत नाही आणि प्रतिवादीवर कुठलाही अन्याय होण्याची शक्यता नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी यांनी केलेली आहे.

४. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे नुसार सदरील दावा आज रोजी पुराव्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. परंतु सदरचा अर्ज हा कायदेशीरपणे चालण्यायोग्य नसल्यामुळे तो फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

५. वादीचा अर्ज आणि त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले.

६. दोन्ही पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद श्रवण.

७. मुळ वादी लक्ष्मीबाई उर्फ सरुबाई भ्र.बाबुराव वाकडे यांनी प्रस्तुतचा दावा शाश्वत मनाई हुकूम व नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रतिवादी विरुध्द् दाखल केलेला आहे. त्यानंतर मुळ वादी लक्ष्मीबाई उर्फ सरुबाई भ्र.बाबुराव वाकडे यांनी वाद मिळकत ही वाटणीपत्राआधारे शिवनारायण पि.दिपक वाकडे यांना दिली. त्यानुसार त्यांनी लक्ष्मीबाई यांचे कायदेशीर वारस या नात्याने मुळ दाव्यामध्ये लक्ष्मीबाई यांचे नाव वगळून स्वतःचे नाव समाविष्ट केलेले आहे. तसेच प्रस्तुत दावा हा साक्षीपुराव्यासाठी प्रलंबीत आहे. या ठिकाणी वादी शिवनारायण यांनी केवळ मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती संदर्भात अर्ज दिलेला असून त्यास मान्यता दिली तर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही,कारण प्रतिवादींना प्रतिपुरावा देण्याची पुरेशी संधी मिळते. त्यामुळे,वादी शिवनारायण यांनी नि.क्र.१०२ मध्ये नमूद दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रकरणामध्ये कोणत्याही टप्प्यावर दावा/लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देता येऊ शकते. पुरावा सुरु झाल्यानंतर वादींनी दावा दुरुस्तीस जरी परवानगी मागितली असली तरी मुळ वादी लक्ष्मीबाई यांनी वाद मिळकत शिवनारायण यांना

वाटणीआधारे वर्ग केल्यामुळे प्रस्तावीत दुरुस्ती करणे गरजेचे आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले आहेत. प्रस्तावित दुरुस्तीला जर परवानगी दिली तर दाव्याचे स्वरुप पूर्णपणे बदलणार नसून प्रतिवादींना त्यांचा प्रतिपुरावा देण्याची पुरेशी संधी देखील मिळते. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना न्यायालयाने उदारमतवादी दृष्टीकोन बाळगावा असे वेळोवेळी माननीय सर्वोच्च आणि उच्च न्यायालय यांनी निर्देशित केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता वादीचा प्रस्तावीत दुरुस्तीचा अर्ज हा सुसंगत असून मंजूर करणे योग्य आहे. पर्यायाने, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्तीचा अर्ज (नि.क्र.१०२) मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | दाव्यातील प्रस्तावित दुरुस्ती करण्यासाठी वादीला परवानगी देण्यात येते. |
| ३ | वादी यांना निर्देशित करण्यात येते की,त्यांनी प्रस्तावित दुरुस्ती केल्यानंतर सुधारित दुरुस्ती दाव्याची प्रत सादर करावी. |

DILIP SHANKARRAO THORAT

Digitally signed by DILIP SHANKARRAO THORAT
Date: 2025.02.17 17:29:15 +0530

(दिलीप शं.थोरात)

दि.१७.०२.२०२५ दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : शिरीष दि.देशमुख

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), जालना.

अपलोड केल्याची तारीख : १७.०२.२०२५.

लघुलेखक(म.)